अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | गुरुवार
०६.०८.२०२६

# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १८७ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

# मराठ्यांची कुणबी प्रमाणपत्र रद्द होताच मनोज जरांगे भडकले

## देवेंद्र फडणवीसांची पहिली प्रतिक्रिया



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - मराठवाड्यात कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळवलेल्या चार मराठा महिला लोकप्रतिनिधींची प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने रद्द केल्यामुळे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील प्रचंड आक्रमक झाले आहेत. त्यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेऊन यावरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लक्ष्य केले. यावर आता देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जात पडताळणी समितीचे कामकाज हे सर्वोच्च न्यायालयाने आखून दिलेल्या नियमानुसार चालते. त्यामध्ये राज्य सरकार कुठलाही हस्तक्षेप करत नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. ते गुरुवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

मनोज जरांगे पाटील काय बोललो हे मी ऐकले नाही. पण मी स्पष्ट सांगतो की, प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडे जातात तेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अंतर्गत काम केले जाते. यामध्ये राज्य सरकारचा कुठलाही हस्तक्षेप नाही. जात पडताळणी समिती सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसारच काम करते. आता कुणबी प्रमाणपत्र किती रद्द केली, याची मला माहिती नाही. पण मी सांगू शकतो की, मोठ्याप्रमाणात त्यांच्याकडे वेगवेगळी प्रमाणपत्रात येतात, त्यामध्ये १०-१२ टक्के रिजेक्शन रेट आहेच त्यांचा. त्यांच्याकडे जी नॉन कुणबी ओबीसी प्रमाणपत्र येतात त्यामध्येही १० टक्के काहीवेळा २५ टक्के रिजेक्ट होतात.

## व्याजदर यंदाही स्थिरच

# एल निनो, युद्धामुळे रिझर्व्ह बँकेला महागाईची धास्ती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने बुधवारी सलग चौथ्या बैठकीत आपल्या मुख्य धोरणात्मक दरात कोणतीही सुधारणा न करता स्थिती कायम ठेवली आहे आणि आपली भूमिका तटस्थ ठेवली आहे. व्याजदरांबाबत, धोरणात्मक भूमिकेबाबत मध्यवर्ती बँकेचे पुढील पाऊल उपलब्ध आकडेवारीवर आधारित असेल, असे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी स्पष्ट केले.

मध्यम कालावधीत मुख्य महागाई दर ४ टक्क्यांच्या लक्ष्यापर्यंत आणणे हे मध्यवर्ती बँकेचे मुख्य उद्दिष्ट आहे, असे मल्होत्रा यांनी पतधोरण जाहीर केल्यानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

सहा सदस्यीय पतधोरण समितीने एकमताने रेपो दर ५.२५ टक्क्यांवर स्थिर ठेवण्याच्या बाजूने मतदान केले.

पश्चिम आशियातील संकटामुळे ऊर्जेच्या वाढलेल्या किमतींमुळे व्यापक महागाई वाढते का, याबाबत अधिक स्पष्टता येईपर्यंत थांबण्याचा निर्णय समितीने घेतला.

पतधोरणाचा निर्णय जाहीर करताना मल्होत्रा म्हणाले की, मुख्य महागाई नजीकच्या काळात वाढण्याची आणि प्रामुख्याने अन्नधान्य व इंधनाच्या किमतींमुळे २०२६-२७ च्या तिसऱ्या तिमाहीत उच्चांक गाठण्याची शक्यता आहे, त्यानंतर ती कमी होईल.

महागाईचा दबाव अजून व्यापक झालेला नाही. कारण मौल्यवान धातू वगळता महागाई नियंत्रणात आहे, असेही त्यांनी सांगितले.

मध्यवर्ती बँकेने चालू आर्थिक वर्षासाठी देशाच्या जीडीपी वाढीचा अंदाज किंचित वाढवून ६.७ टक्के केला. तर महागाईचा अंदाज अल्पसा घटवून ५ टक्के केला.

सामान्य महागाईचा दबाव आतापर्यंत मर्यादित राहिला असला तरी अन्नधान्य, इंधन आणि इतर कच्च्या मालाच्या वाढत्या किमतींमुळे महागाई सर्वसमावेशकपणे वाढण्याचा धोका कायम आहे, असे भारतीय रिझर्व्ह बँकेने बुधवारी म्हटले आहे. पश्चिम आशियातील संघर्षाच्या वेगाने बदलणाऱ्या घडामोडींमुळे जागतिक आर्थिक स्थिती ओलीस धरली गेली आहे. याचा आपल्या अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम झाला असला, तरी भारताची मजबूत मॅक्रो-इकॉनॉमिक पायाभूत तत्त्वे या जागतिक धक्क्याचा खंबीरपणे सामना करण्यास मदत करत आहेत. महागाई नियंत्रित ठेवणे, आर्थिक प्रणाली किंवा चलनाची स्थिरता जपणे यासाठी जे काही करावे लागेल ते आम्ही करू.

## थोडक्यात

### ओझर्डे, सडावाघापूर येथे उलटा धबधबा पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**कराड** -पाटण तालुक्यातील कोयनानगर परिसरात पडत असलेल्या दमदार पावसामुळे कोयनानगर परिसराने हिरवा शालू परिधान केला आहे. कोयनेचे पावसाळी पर्यटन चांगलेच बहरू लागल्याने वीकेंड व पावसाळी पर्यटणामुळे कोयनानगर येथे निसर्ग पर्यटनाचा मनमुरादपणे आस्वाद घेण्यासाठी पर्यकांची हाऊसफुल्ल गर्दी पाहायला मिळत आहे. कोयना धरण, नेहरू उद्यान व नवजा येथील ओझर्डे धबधबा आणि सडावाघापूर येथील उलटा धबधबा पाहण्यासाठी परराज्यातील पर्यटकांची तालुक्यात प्रचंड गर्दी होत आहे.

## टेंभुरखेडच्या सर्वींनी दिला स्वत:तील सुप्तगुणांना वाव : उत्पादनांना जगभरात मागणी

# एकमेकींच्या सहकार्याने महिलांनी उभी केली स्वावलंबनाची नवी वाट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** - एका महिलेने उद्योग सुरू केला, त्यानंतर दुसऱ्या महिलेनेही धाडस केले आणि आज त्याच प्रेरणेतून अनेक महिला स्वतःचा व्यवसाय यशस्वीपणे चालवत आहेत. 'ती करू शकते, तर मी का नाही?' या सकारात्मक विचाराने तालुक्यातील टेंभुरखेडा परिसरातील महिलांमध्ये उद्योजकतेची नवी चळवळ निर्माण झाली आहे.

सुरुवातीला १-२ महिलांनी उद्योग करण्याचे ठरवले आणि ते प्रत्यक्षात आणले. गरज आणि ग्राहकांच्या सुचनेतून प्रेरणा मिळाली. त्यानंतर प्रत्येकीला ती करु शकते तर मी का नाही, ही भावना आली. मग हेवा न करता एकमेकींना साथ देत नवीन व्यवसाय सुरु झाले. विशेष म्हणजे, एकमेकींचा हेवा न करता सर्वांनी परस्परांना मार्गदर्शन, सहकार्य आणि प्रोत्साहन दिले.

या सहकार्याच्या भावनेतून परिसरात अनेक लघुउद्योग सुरू झाले. त्यामुळे महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळाले, कुटुंबाच्या उत्पन्नात भर पडली आणि अनेकांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधीही उपलब्ध झाल्या.



> 'महिलांनी एकमेकींचा असाच करावा हेवा, ज्यातून चांगले चांगले घडत जावा' अशा पध्दतीने आमच्या गावातील प्रत्येक महिलेने एकमेकांच्या पाऊलावर पाऊल देत स्वत:तील सुप्तगुणांना वाव दिला आहे, या संपूर्ण व्यवसायाकरिता ज्यांनी ज्यांनी आम्हाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रित्या सहकार्य केलं अशा सर्वांचे मी आभार मानते, ही तर केवळ सुरुवात आहे, आणखी खुप मोठी क्रांती करावयाची आहे, अधिक माहीतीसाठी ९४२१७८७८०४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन उद्योजक सीमा अभय देशमुख यांनी केले आहे.

महिलांनी दाखवून दिले की, यशाचा मार्ग स्पर्धेतून नव्हे तर सहकार्य, विश्वास आणि एकजुटीतून अधिक मजबूत होतो. आज या महिला स्वतः सक्षम बनण्याबरोबरच इतरांसाठी प्रेरणास्थान ठरत असून त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

कुमुद मनोज धामणे - साडीचे दुकान व पार्लर, सीमा अभय देशमुख - ढोकळा प्रीमिक्स तसेच सर्व प्रकारचे प्रीमिक्स, वीणा नितीन देशमुख, ज्योती नितेश देशमुख, सुनीता मुकेश देशमुख - माऊली गृह उद्योग / संपूर्ण फराळ, रेखा रविंद्र देशमुख, सीमा चंद्रशेखर देशमुख, खुशबु मुकेश देशमुख - सातू व दालबाटी प्रीमिक्स, दुर्गा घोडकी - रेडीमेड ढोकळा, अप्पम व इडली बनवुन देणे, मनिषा नरेंद्र पंडागळे - समर्थ आयुर्वेदिक औषधी व शिकवणी वर्ग, वंदना भूपेश बारस्कर - चहा मसाला व गरम मसाला, ममता देशमुख - टाकाऊ पासून टिकाऊ व शिवण क्लास, प्रियंका शशिभूषण उमेकर, दिपाली हर्षवर्धन आजने, वीणा अरुण जारी, सारिका मनोज देशमुख - पापड गृहउद्योग. बाजारात भेसळ पाहून सर्वांनी स्वच्छ, चवदार, पौष्टिक पदार्थ बनवण्यावर भर दिला. इडली प्रीमिक्स, चकली प्रीमिक्स, अप्पम, सांबार मसाला अशी उत्पादनही सुरु झाली. पारंपारिक चव आणि रास्त दर यामुळेच मागणीचा दर दिवसेंदिवस वाढत गेला. हे सर्व पदार्थ एकाच छत्राखाली उपलब्ध करून देण्याची सोयही केली. सुरुवात टेंभुरखेडच्या लेकी-सुना या ग्रुपवरुन झाली. ग्रुपमधील सर्वांनी स्टेटस ठेवले, खरेदी केली आणि व्यवसाय वाढवला. गाव, नातेवाईक, मित्र मंडळींचा पाठिंबा मिळाला. पाहता पाहता ढोकळा पुणे, सिंगापूर, बंगलोर, अमेरिकेपर्यंत पोहोचला. एका कंपनीनेही येथील प्रीमिक्स लॉन्च केले.

विशेष म्हणजे वयाने जरी सारख्या असल्या तरी या सर्वजणी एकमेकींच्या सासु-सुना लागतात. तरीही एकमेकांना करु सहाय्य, अवघे धरु सुपंथ ही भावना मनात रुजली. या सर्वांमध्ये महत्त्वाचे म्हणजे तुम्हा-आम्हाची मिळालेली साथ.

# 'गाणी हळू वाजव' एवढंच बोलला अन... : दोन सख्या भावांमध्ये रक्तरंजित खेळ, दोघांचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - मुंबईतील विक्रोळी पार्कसाईट परिसरात कौटुंबिक वादातून घडलेल्या हल्ल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. राहुल नगर येथे एकाच कुटुंबातील भावांमध्ये झालेल्या वादानंतर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. या घटनेत एका व्यक्तीसह त्याच्या १४ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला असून पत्नी आणि लहान मुलगा गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल नगरमध्ये राहणाऱ्या विश्वकर्मा कुटुंबातील चार भाऊ एकाच घरात राहत होते. त्यापैकी काही जण घराच्या पोटमाळ्यावर वास्तव्यास होते. पहाटेच्या सुमारास सुनील विश्वकर्मा (४०) यांनी मोठ्या आवाजात गाणी लावल्याने त्यांच्या भावांमध्ये वाद झाला.






# नाराज जेन न साठी फडणवीस सरकारचा डॅमेज कंट्रोल प्लॅन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – राज्यात मोठ्या प्रमाणात नाराज असलेल्या जेन न युवक-युवतींना पुन्हा आपल्याकडे खेचण्यासाठी फडणवीस सरकारने नवा डॅमेज कंट्रोल प्लान आखला आहे. रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने ३१ मार्च २०२७ पर्यंत १ हजार रोजगार मेळाव्यांचे आयोजन केले जाणार आहे. या रोजगार मेळाव्यांची व्यापक माहिती गरजू तरुणांपर्यंत पोहोचण्याचे आदेश कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले आहेत. मंत्री लोढा यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय रोजगार मेळावा समितीची बैठक ही झाली. या बैठकीत राज्यस्तरीय रोजगार मेळाव्याचे अध्यक्ष डॉ.रणजित पाटील, सदस्य डॉ.सरोजिनी राऊत, रविंद्र देशपांडे, विशाल टिब्रेवाल, जयेश ढाके, राहुल खोले, सदस्य सचिव तथा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाचे आयुक्त डॉ.अमित सैनी यासह शासकीय सदस्य या बैठकीला उपस्थित होते. – आयटीआय व्यतिरिक्त इतर कॉलेजमधील विद्यार्थी, अपस्किलिंगची गरज असणारे तरुण आणि सामाजिक संस्थांशी संपर्क साधून रोजगार मेळाव्याचा विस्तार केला जाणार.

# भिमराव वानखडे यांचे निधन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथुन जवळच असलेल्या जरुड येथील उत्क्रांती शिक्षण संस्थेचे आधारवड, माजी प्राचार्य तथा उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष रामराव वानखडे यांचे जेष्ठ बंधू वरुड शहरातील श्रीराव वाडी परिसरातील रहिवाशी सेवानिवृत्त तालुका कृषि अधिकारी भिमराव नामदेव



वानखडे यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी दिर्घ आजार आणि वृध्दापकाळाने मंगळवारी निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर शहरातील श्री केदारेश्वर मोक्षधाम येथे स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक आणि शहरवासियांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे भाऊ, मुले, मुली, सुना, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाने जरुडसह शहरात शोक व्यक्त केल्या जात आहे.

## जि.प.प्राथ.केंद्र शाळा राजुरा बाजार येथे

# विस्तार अधिकारी सुनिल राठोड यांचा सेवापुर्ती सोहळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – जि.प.प्राथ.केंद्र शाळा राजुरा बाजार येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी तसेच अण्णाभाऊ साठे जयंती व सुनील राठोड विस्तार अधिकारी बीट राजुरा बाजार यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न झाला.

जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा राजुराबाजार येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी तसेच अण्णाभाऊ साठे जयंती व राजुरा बाजार बीट विस्तार अधिकारी सुनील राठोड यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न झाला. लोकमान्य टिळक तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख मोहन नारिंगे उपस्थित होते. सत्कारमुर्ती सुनील राठोड यांना जि.प.प्राथ.केंद्र शाळा राजुरा बाजार वतीने शाल, श्रीफळ व शिल्ड देवुन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सेवानिवृत्त मुख्याध्यापक रमेश सहारे, रंजनकुमार राठोड, महेश्वर पवार, सुजाता सहारे, अरविंद गुडधे, मोरे, शा.व्य.स.सदस्य पोद्दार, सुनीता देशमुख, सुनंदा कुकडे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होत्या. याप्रसंगी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. रमेश सहारे तसेच सुनील राठोड यांच्या विषयी मोहन नारिंगे, पोतदार, सुनीता देशमुख, सुजाता सहारे, महेश्वर पवार यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना सुनील राठोड यांनी मी आता जीवनात खूप आनंदी आहे, असे उदगार काढले. रमेश सहारे यांच्याकडून सर्व मुलांना जेवण देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन सोनाली धोटे तर आभार अश्विनी चांभारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी केंद्रप्रमुख मोहन नारिंगे, मुख्याध्यापिका सुनंदा कुकडे, सोनाली धोटे, मंदा राऊत, अश्विनी चांभारे व इंगळे यांनी प्रयत्न केले.

# पुराव्याअभावी विनयभंगाच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

## जिल्हा सत्र न्यायालयाचा निर्णय : ॲड अंकिता जयस्वाल यांची मांडली बाजू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने एका महत्त्वपूर्ण फौजदारी खटल्यात पुराव्याअभावी आरोपीची निर्दोष मुक्तता करत महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.

या प्रकरणात फिर्यादी महिलेने आरोपी किशोर याच्याविरुद्ध तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार आरोपीने फिर्यादीच्या घरी जाऊन तिचा हात पकडला, तिला ओढून कवठ्यात पकडले त्यानंतर फिर्यादीने आरोपीला धक्का देत घराबाहेर पळ काढला व आरडाओरडा केला. घडलेली घटना तिने तिच्या पतीला सांगितल्यानंतर आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३५४, ३५४ (अ), ४४८ तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम कलम ३ (१)(i), ३ (१) (ii) व ३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

खटल्या दरम्यान अभियोजन पक्षाने सादर केलेल्या साक्षी व दस्तऐवजी पुराव्यांचा सखोल विचार केल्यानंतर न्यायालयाच्या निदर्शनास आले की, आरोपीविरुद्धचे आरोप शंकातीतपणे सिद्ध करण्यास अभियोजन पक्ष अपयशी ठरला.

आरोपीतर्फे बाजु मांडताना ॲड.अंकिता जैस्वाल यांनी प्रभावी युक्तिवाद करत न्यायालयास निदर्शनास आणुन दिले की, आरोपीने फिर्यादीसोबत कोणताही गैरप्रकार केलेला नाही. उलट, फिर्यादीच्या पतीचा आरोपीसोबत पैशाच्या व्यवहारावरुन वाद होता आणि त्या वैमनस्यातून आरोपीला खोट्या गुन्ह्यात अडकविण्यात आले. आरोपी हा समाजातील प्रतिष्ठित नागरिक असून त्याच्याविरुद्धचे आरोप विश्वासार्ह व ठोस पुराव्यांनी सिद्ध होत नसल्याचेही त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणुन दिले.

दोन्ही पक्षांचा युक्तिवाद, साक्षीदारांचे जबाब व उपलब्ध पुराव्यांचे परीक्षण केल्यानंतर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने आरोपी किशोर याची सर्व आरोपांतुन निर्दोष मुक्तता केली.

## लहुजी क्रांती मोर्चा तसेच सखल मातंग समाजाच्या वतीने

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरात लहुजी क्रांती मोर्चा तसेच सखल मातंग समाजाच्या संयुक्त विद्यमानाने लोकशाहीर साहित्यसम्राट, सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती अण्णाभाऊ साठे सभागृह येथे आयोजीत करण्यात आली होती.

जयंती प्रसंगी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आणि सायंकाळी शहरातून भव्य अशी रॅली काढण्यात आली.

कार्यक्रमाचे उदघाटक म्हणुन आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर होते तर अध्यक्ष म्हणुन नगराध्यक्ष ईश्वर सलामे होते. प्रमुख अतिथी म्हणुन नगरसेविका प्राजक्ता



चौधरी, भाग्यश्री अधव, भारती माळोदे, नगरसेवक नितेश धुर्वे, बंटी दुर्गे, जगदीश वानखडे, स्वाती चव्हाण, प्रा.जितेश खडसे, गजु ढोके उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्तविक भाषणात माजी नगराध्यक्ष रविंद्र थोरात यांनी उपस्थित



जनसमुदायाला सर्वांगीण प्रगतीसाठी एकजुटीने, सामजस्याने अण्णाभाऊ यांच्या विचारावर चालण्याची गरज आहे, असे प्रतिपादन केले.

आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी 'सदृढ समाज निर्मितीसाठीसाठी, बहुजनसमाजाच्या प्रगतीसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ यांचे विचार प्रासंगिक आहे असे सांगितले तर नगराध्यक्ष इंजि.ईश्वर सलामे यांनी अण्णाभाऊनी क्रांतिकारी साहित्य लिहून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अग्रस्थानी राहून नवं महाराष्ट्राची निर्मिती केली जो आज देशाला मार्ग दाखवतो. याप्रसंगी नगरसेविका प्राजक्ता चौधरी यांनी सुध्दा मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वर्षा थोरात, नलिनी इंगळे, शालू वानखडे, लक्ष्मी थोरात, तसेच लहुजी क्रांती मोर्चाचे जगदीश वानखडे, दिवाकर वानखडे, शंकर थोरात, अनिकेत थोरात, विशाल इंगळे, आदेश थोरात, शुभम इंगळे, मारोती थोरात, यशवंत तायवाडे, सुनील थोरात यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन इंजि.प्रविण थोरात तर आभार दिपक थोरात यांनी मानले.

## भारतीय बौद्ध महासभा शाखेच्या वतीने

# अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – भारतीय बोद्ध महा सभा शाखेच्या वतीने बौध्द विहार येथे साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे जयंती व शाहू छत्रपती महाराज आरक्षण सप्ताह मोठा उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरवात महामानवाचा प्रतिमेला अभिवादन व पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महिला बालकल्याण सभापती प्रिया पाटील होत्या तर सुप्रसिद्ध मराठी नाट्य कलावंत विजय घाटोळे, प्रसिद्ध साहित्यिक डॉ.रवी दलाल, महेंद्र सातपुते, मिशनरी गायक अरुण सहारे, पूर्व जॉईट डायरेक्टर सी.एस.ढवळे, नगरसेवक राकेश दवंडे, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका रंजना पाटील, भारतीय बुद्ध महासभा अध्यक्ष रमेश कुसळे, नारायण घोरपडे, शांता गायकी, संदेश डोंगरे, गोकुळ दुपारे, कार्यक्रमात बहुसंख्य उपासक, उपासिका उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन भारतीय बोद्ध महासभा जिल्हा सदस्य गोपाल पाटील तर आभार रणदीप दवंडे यांनी मानले.

## अखिल भारतीय ग्राहक पंचायत कडूनविद्युत मीटर बसविण्याच्या सक्तीचा निषेध

# प्रि-पेड विद्युत मीटरची सक्ती म्हणजे ग्राहक अधिकारावर अतिक्रमण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**वरुड** – प्रि-पेड विद्युत मीटरची सक्ती म्हणजे ग्राहकांच्या अधिकारावर अतिक्रमण होत असा आरोप अखिल भारतीय ग्राहक पंचायत तालुका शाखेने केला असुन राज्यातील सव्वा दोन कोटींपेक्षा अधिक ग्राहकांना स्मार्ट प्रिपेड मीटर लावण्याची सक्ती ही विद्युत ग्राहकांना कायद्याने दिलेल्या निवड करण्याच्या अधिकारावर प्रत्यक्ष अतिक्रमणअसून त्यामुळे ग्राहकांचे अधिकृतपणे आर्थिक शोषण करण्याचा परवानाच महावितरण कडून मिळणार असल्याचे स्पष्ट मत अखिल भारतीय ग्राहक पंचायत कडून माडण्यात आले आहे.

आधीच सततच्या वीज दरवाढीमुळे ग्राहकांचे कंबरडे मोडले गेले आहे. वीज ग्राहकांना या अतिरिक्त प्रचंड खर्चामुळे मोठा आर्थिक फटका बसणार आहे. उत्तरप्रदेश, बिहार, राजस्थान, हरियाणा या राज्यात जिथे जिथे प्रीपेड स्मार्ट मीटर लावण्यात आले. तेथील वीज ग्राहकांच्या या बाबतचा अनुभव फार वाईट आहेत. केंद्र सरकार फक्त २ हजार कोटी रुपयांचे अनुदान स्वरुपातील भार उचलणार आहे. उर्वरित हे राज्य सरकारलाच उभारावी लागणार आहे, त्याचा आर्थिक दरवाढीच्या रुपाने ग्राहकांवरच पडणार आहे. त्यामुळे ग्राहकांना नविन विद्युत मीटर बसविण्याची सक्ती करु नये अशी मागणी अ.भा.ग्राहक पंचायत जिल्हाध्यक्ष अशोक हांडे, प्रा.संतोष, तालुकाध्यक्ष प्रकाश पोकळे, सचिव दिपक निंबाळकर, उपाध्यक्ष प्रकाश अंबाडकर, महिला प्रमुख निशा पानसे, सहसचिव माधुरी भगत, वैशाली मोरस्कर, मार्गदर्शक तारा बारस्कर, जमीर पटेल, रंजना मालपे, भुषण महात्मे, किशोर भगत, प्रमोद लव्हाळे , वासुदेव सालोडे, रमेश सालपे, डॉ.संदिप बेहरे, डॉ.शुभा शेळके आदी उपस्थित होते.


## संपादकीय

**{ न हरता, न थकता आणि न थांबता प्रयत्न करणाऱ्यांसमोर कधीकधी नशीब सुद्धा हारत }**

## आत्मनिर्भर, सक्षम आणि समृद्ध भारताकडे वाटचाल

भारताने गेल्या दशकात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात घेतलेली झेप ही जगासाठी प्रेरणादायी ठरली आहे. 'डिजिटल इंडिया' ही केवळ एक सरकारी योजना नसून भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय परिवर्तनाची व्यापक चळवळ आहे. १ जुलै २०१५ रोजी सुरू झालेल्या या अभियानाचे उद्दिष्ट भारताला डिजिटलदृष्ट्या सक्षम समाज आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्था बनविणे हे आहे. या उपक्रमामुळे सरकारी सेवा नागरिकांच्या दारात पोहोचल्या, डिजिटल व्यवहारांना गती मिळाली आणि ग्रामीण भारतालाही विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न झाला. आज भारताची डिजिटल अर्थव्यवस्था वेगाने विस्तारत आहे. यूपीआय सारख्या डिजिटल पेमेंट प्रणालींमुळे आर्थिक व्यवहार अधिक जलद, सुरक्षित आणि पारदर्शक झाले आहेत. लहान व्यापाऱ्यांपासून ते मोठ्या उद्योगांपर्यंत सर्वच स्तरांवर डिजिटल व्यवहार स्वीकारले जात आहेत. रोख व्यवहारांवरील अवलंबित्व कमी होत असून आर्थिक व्यवहारांची नोंद व्यवस्थित राहिल्याने करव्यवस्थेलाही फायदा होत आहे. डिजिटल व्यवहारांमुळे सामान्य नागरिकाचा वेळ, पैसा आणि श्रम यांची मोठी बचत झाली आहे. डिजिटल इंडिया अभियानामुळे ई-गव्हर्नन्सला नवी दिशा मिळाली. विविध सरकारी प्रमाणपत्रे, आधार, पॅन, पासपोर्ट, शिष्यवृत्ती, जमीन नोंदणी, कर भरणा, आरोग्य सेवा आणि इतर अनेक सुविधा ऑनलाइन उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे सरकारी कार्यालयांतील गर्दी कमी झाली असून प्रशासनात पारदर्शकता वाढली आहे. भ्रष्टाचाराला आळा बसण्यासही या प्रक्रियेची मदत झाली आहे. शिक्षण क्षेत्रातही डिजिटल क्रांती घडली आहे. ऑनलाइन वर्ग, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म, डिजिटल ग्रंथालये आणि आभासी प्रयोगशाळांमुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण सहज उपलब्ध झाले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही शहरांप्रमाणे शैक्षणिक संधी मिळू लागल्या आहेत. कोविड-१९ महामारीच्या काळात डिजिटल शिक्षणाचे महत्त्व विशेषत्वाने अधोरेखित झाले. आरोग्य क्षेत्रात टेलिमेडिसिन, ऑनलाइन अपॉइंटमेंट, डिजिटल आरोग्य नोंदी आणि ई-संजीवनीसारख्या सेवांमुळे रुग्णांना घरबसल्या वैद्यकीय सल्ला मिळू लागला आहे. विशेषतः दुर्गम भागातील नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरत आहे. डिजिटल इंडिया अभियानामुळे रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण झाल्या आहेत. स्टार्टअप्स, ई-कॉमर्स, फिनटेक, सॉफ्टवेअर विकास, डिजिटल मार्केटिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा आणि डेटा विश्लेषण यांसारख्या क्षेत्रांमध्ये लाखो युवकांना रोजगार मिळत आहे.

# 'ती'ची ओळख, 'ती'चा अधिकार - कायद्याच्या नजरेतून



कुटुंबाचा पाया असलेल्या स्त्रीला आज समाज 'लाडकी बहीण' म्हणून सन्मान देत आहे. पण हा सन्मान केवळ शब्दांपुरता मर्यादित न राहता तो तिच्या हक्कांमध्ये आणि अधिकारांमध्ये रूपांतरित होणे गरजेचे आहे. 'ती'ची ओळख, 'ती'चा अधिकार' ही फक्त घोषणा नाही, तर संविधानाने आणि कायद्याने दिलेली हमी आहे.

बळीराजाच्या संसाराला समर्थ साथ देणारी महिला म्हणजे शेतकरी कुटुंबाची कणा आहे. शेतात राबणे, घर सांभाळणे, मुलांचे शिक्षण बघणे ते सण-उत्सव सगळं ती एकटी निभावते. पूर्वी तिचे हे काम 'कर्तव्य' म्हणून पाहिले जायचे. आता मात्र 'लाडकी बहीण' सारख्या योजनांमधून सरकार तिला आर्थिक पाठबळ देत आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे - तिच्या श्रमाला किंमत आहे आणि तिच्या सहभागाशिवाय गावाची आणि राज्याची प्रगती शक्य नाही.

**कायद्याचं बोल काय सांगतं?**

भारतीय संविधान स्त्री-पुरुष समानतेची ग्वाही देतात. त्याचबरोबर हुंडाबंदी कायदा, घरगुती हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५, मातृत्व लाभ कायदा, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंध कायदा अशा अनेक कायद्यांमधून महिलांना विशेष संरक्षण दिले आहे.

सगळ्यात महत्वाचा मुद्दा म्हणजे मालमत्तेचा अधिकार. २००५ च्या हिंदू वारसा कायद्यानुसार मुलगी आणि मुलगा यांना वडिलोपार्जित संपत्तीत समान अधिकार आहे. तरीही ग्रामीण भागात अनेक महिलांना याची माहितीच नसते. जमीन तिच्या नावावर असेल तर ती केवळ कागदावर मालकीण होत नाही, तर निर्णय घेणारी खऱ्या अर्थाने 'सक्षम महिला' बनते.

**सक्षम होता शेतकरी महिला, महाराष्ट्र हा बदलेल**

आज महाराष्ट्रात महिला बचत गट, स्वयं-सहाय्यता गट, कृषी सखी यांच्या माध्यमातून महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होत आहेत. त्या ट्रॅक्टर चालवतात, ड्रोनने फवारणी करतात, शेतमालाची ऑनलाइन विक्री करतात. जेव्हा एका शेतकरी महिलेच्या हातात बँक खाते, आधार कार्ड आणि योजनेचा लाभ येतो, तेव्हा ती केवळ लाभार्थी राहत नाही तर कुटुंबाची निर्णयकर्ता बनते.

'लाडकी बहीण' योजना ही याच दिशेने टाकलेले पाऊल आहे. महिन्याला मिळणारी रक्कम जरी छोटी वाटत असली तरी तिचा उपयोग तिला स्वातंत्र्य देतो. औषध, मुलांचे शिक्षण, छोटा व्यवसाय - या गोष्टींसाठी तिला कोणावर अवलंबून राहावे लागत नाही. हाच खरा अधिकार आहे.

कायदा आहे, योजना आहेत, पण अंमलबजावणी आणि जनजागृती महत्वाची आहे. प्रत्येक पंचायत, अंगणवाडी आणि शाळेतून महिलांना त्यांच्या हक्कांची माहिती दिली पाहिजे. पोलिस स्टेशन, तहसील कार्यालय येथे महिलांसाठी मदत कक्ष असणे गरजेचे आहे.

कुटुंबातील पुरुषांनीही समजून घेतले पाहिजे की स्त्रीला दिलेला अधिकार म्हणजे कुटुंबाची प्रगती आहे.

शेवटी एकच - तिच्या कष्टाच्या या मातीतूनच सुवर्णयुग अवतरणार आहे. ज्या दिवशी 'ती'ला तिची खरी ओळख आणि तिचा पूर्ण अधिकार मिळेल, त्या दिवशी घर, गाव आणि संपूर्ण महाराष्ट्र खऱ्या अर्थाने प्रगतीच्या वाटेवर असेल. कारण जेव्हा स्त्री सशक्त होते, तेव्हा पिढी सशक्त होते.



**शेषराव कडू**

# डिजिटल इंडिया : विकसित भारताचा भक्कम पाया

आजचे युग हे डिजिटल तंत्रज्ञानाचे युग आहे. जगभरात प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर झपाट्याने वाढत असून भारतही या परिवर्तनात अग्रेसर ठरत आहे. 'डिजिटल इंडिया' ही संकल्पना केवळ इंटरनेट किंवा मोबाईलपुरती मर्यादित नसून ती देशाच्या सर्वांगीण विकासाची नवी दिशा आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शासन, उद्योग, शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक व्यवहार अधिक वेगवान, पारदर्शक व सुलभ करण्याचा प्रयत्न या अभियानातून होत आहे.




भारतामध्ये आज यूपीआय सारख्या डिजिटल पेमेंट प्रणालीमुळे आर्थिक व्यवहारांमध्ये मोठी क्रांती घडली आहे. छोट्या चहाच्या टपरीपासून ते मोठ्या व्यावसायिक संस्थांपर्यंत सर्वत्र क्यूआर कोडद्वारे व्यवहार होत आहेत. यामुळे रोख पैशावरील अवलंबित्व कमी झाले असून व्यवहार अधिक सुरक्षित आणि पारदर्शक झाले आहेत. ग्रामीण भागातील नागरिकही आता मोबाईलद्वारे बँकिंग सेवा आणि सरकारी योजनांचा लाभ सहजपणे घेत आहेत.

डिजिटल इंडियामुळे ई-गव्हर्नन्सला नवी चालना मिळाली आहे. आधार, पॅन, उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, शिष्यवृत्ती, पासपोर्ट, कर भरणा अशा अनेक सेवा आता ऑनलाइन उपलब्ध आहेत. त्यामुळे नागरिकांचा वेळ वाचतो, सरकारी कार्यालयांतील गर्दी कमी होते आणि भ्रष्टाचारालाही काही प्रमाणात आळा बसतो. शासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी करण्यात डिजिटल सेवांची मोठी भूमिका आहे.

शिक्षण क्षेत्रातही डिजिटल तंत्रज्ञानाने नवे क्षितिज खुले केले आहे. ऑनलाइन वर्ग, ई-पुस्तके, शैक्षणिक ॲप्स आणि डिजिटल ग्रंथालयांमुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण घरबसल्या मिळत आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरली आहे. त्याचप्रमाणे आरोग्य क्षेत्रात टेलिमेडिसिन, ऑनलाइन अपॉइंटमेंट आणि डिजिटल आरोग्य नोंदीमुळे रुग्णांना जलद आणि सोयीस्कर सेवा मिळत आहे. मात्र, डिजिटल भारताच्या प्रवासात काही आव्हानेही आहेत. सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, डेटा गोपनीयतेचे प्रश्न आणि डिजिटल साक्षरतेचा अभाव ही गंभीर समस्या आहेत. अनेक ग्रामीण भागात अजूनही इंटरनेटची गुणवत्ता समाधानकारक नाही.

त्यामुळे प्रत्येक नागरिकाला सुरक्षित डिजिटल व्यवहारांचे प्रशिक्षण देणे आणि मजबूत सायबर सुरक्षा व्यवस्था उभारणे ही काळाची गरज आहे. डिजिटल इंडिया ही केवळ सरकारी योजना नसून विकसित भारताचे स्वप्न साकार करण्याचा मजबूत पाया आहे. तंत्रज्ञानाचा जबाबदारीने आणि सुरक्षितपणे वापर केल्यास भारत आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिकदृष्ट्या अधिक सक्षम राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहील.

# मतवादी क्या जाने, तत्ववादी की बात : सूरज डूबा, उल्लू कहे हुआ सवेरा!

आजच्या भारतात आणि जगात विचारांचे ध्रुवीकरण झपाट्याने वाढत आहे. प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या गटाशी, पक्षाशी, धर्माशी, जातीशी किंवा विचारसरणीशी स्वतःची ओळख जोडून घेत आहे. ओळख असणे चुकीचे नाही; परंतु जेव्हा ती विवेक, तर्क आणि सत्य यांच्यावर मात करू लागते, तेव्हा समाजासाठी धोक्याची घंटा वाजू लागते. अशा मानसिकतेचे अचूक चित्रण करणारी ही हिंदी म्हण आजही तितकीच समर्पक वाटते‘मतवादी क्या जाने, तत्ववादी की बात; सूरज डूबा, उल्लू कहे हुआ सवेरा!'

ही म्हण केवळ भाषेचा अलंकार नाही; ती मानवी मानसशास्त्राचा आणि सामाजिक वास्तवाचा आरसा आहे. घुबड हा रात्रचर पक्षी आहे. दिवसाचा प्रकाश त्याला अनुकूल नसतो, तर अंधारात तो सहज वावरतो. म्हणूनच सूर्यास्त झाला की त्याला जणू पहाटच झाली, असे भासते. वस्तुस्थिती बदलत नाही; बदलतो तो पाहणाऱ्याचा दृष्टिकोन. समाजातही असेच घडते. जेव्हा माणूस स्वतःच्या मतांचा कैदी होतो, तेव्हा सत्याचे महत्त्व कमी होते आणि स्वतःच्या मताला पूरक वाटणारेच सत्य त्याला खरे वाटू लागते.

आज माहितीचे युग आहे; परंतु त्याचबरोबर दिशाभूल करणाऱ्या माहितीचेही युग आहे. सोशल मीडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल प्रचार आणि क्षणाक्षणाला बदलणारे माध्यमविश्व यामुळे माहितीचा महापूर आला आहे. दुर्दैवाने त्या माहितीचे चिकित्सक विश्लेषण करण्याची वृत्ती मात्र तितक्या वेगाने विकसित झालेली नाही. परिणामी, अनेक जण माहितीची सत्यता पडताळून पाहत नाहीत; ती त्यांच्या आधीपासूनच्या मतांशी जुळते का, एवढेच पाहतात. जे पटते ते पुढे पाठवले जाते, जे पटत नाही ते नाकारले जाते. अशा वातावरणात विवेकाचा पराभव होतो आणि मतवादाचा विजय होतो.

मतवादाची सुरुवात श्रद्धेने होते; पण त्याचा शेवट अनेकदा अंधश्रद्धेत होतो. सुरुवातीला एखाद्या विचारसरणीबद्दल आदर असतो, नंतर तीच विचारसरणी अंतिम सत्य वाटू लागते. मग त्या विचारावर प्रश्न विचारणारा शत्रू वाटू लागतो. व्यक्ती, पक्ष, धर्म किंवा संस्था यांच्यावर विधायक टीका करण्याची जागा उरत नाही. अंधसमर्थनालाच निष्ठा समजले जाते. अशा परिस्थितीत सत्य बोलणारा एकटा पडतो, तर असत्याचा कोलाहल समाजावर अधिराज्य गाजवतो.

इतिहास सांगतो की समाजात मोठे परिवर्तन मतवादामुळे झाले नाही; ते तत्त्ववादामुळे झाले. समाजसुधारकांनी तत्कालीन लोकमताची भीती बाळगली असती, तर इतिहास वेगळा असता. महात्मा ज्योतिराव फुले यांनी जातिव्यवस्था आणि अज्ञानाविरुद्ध आवाज उठवला, कारण त्यांच्यासाठी सत्य महत्त्वाचे होते. सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी समाजाचा रोष पत्करला, कारण त्यांच्यासाठी मानवी समानता हे सर्वोच्च तत्त्व होते. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाचा मार्ग स्वीकारला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र दिला, कारण विचारस्वातंत्र्याशिवाय लोकशाही जिवंत राहू शकत नाही.

आज लोकशाहीसमोरील मोठे संकट विरोधी विचारांचे नाही; तर चिकित्सक विचारांच्या अभावाचे आहे. मतभेद असणे ही लोकशाहीची ताकद आहे; पण मतभेदांचे वैरात रूपांतर होणे ही तिची कमकुवत बाजू आहे. प्रत्येकाने स्वतःच्या मतालाच अंतिम सत्य मानले, तर संवाद थांबेल, तर्क हरवेल आणि लोकशाही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित राहील.

याहूनही गंभीर बाब म्हणजे आज अनेकदा व्यक्ती तत्त्वांपेक्षा व्यक्तिमत्त्वांच्या प्रेमात पडते. विचारांपेक्षा चेहऱ्यांचे राजकारण, धोरणांपेक्षा घोषणांचे आकर्षण आणि कार्यापेक्षा प्रतिमेचे व्यवस्थापन अधिक महत्त्वाचे मानले जाते. 'मी म्हणतो तेच अंतिम, मी करतो तेच योग्य, माझेच कार्य सर्वश्रेष्ठ आणि जबाबदारी मात्र दुसऱ्यांची,' अशी मानसिकता हळूहळू समाजात रुजताना दिसते. अशा वृत्तीत आत्मपरीक्षणाला जागा राहत नाही. परिणामी प्रश्न विचारणाऱ्यांकडे संशयाने पाहिले जाते. परंतु प्रश्न विचारणे म्हणजे विरोध नव्हे; प्रश्न विचारणे म्हणजे लोकशाही जिवंत असल्याचे लक्षण आहे. तत्त्ववाद आपल्याला शिकवतो की कोणतीही व्यक्ती, संस्था किंवा सत्ता टीकेच्या पलीकडे नसते. सत्य कोणाच्याही मालकीचे नसते. ते सतत शोधावे लागते, तपासावे लागते आणि आवश्यक वाटल्यास स्वतःच्या मतांचाही पुनर्विचार करावा लागतो. ही बौद्धिक प्रामाणिकता तत्त्ववादाची खरी ओळख आहे. आज समाजाला अशा नागरिकांची गरज आहे जे कोणत्याही अफवेवर विश्वास ठेवण्यापूर्वी पुरावा मागतील, कोणत्याही घोषणेवर टाळ्या वाजवण्यापूर्वी तिचे परिणाम तपासतील आणि कोणत्याही व्यक्तीचे समर्थन किंवा विरोध करण्यापूर्वी संविधान, विज्ञान, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय या मूल्यांच्या कसोटीवर प्रत्येक गोष्ट पडताळून पाहतील.

लोकशाही केवळ मतदानावर चालत नाही; ती विचारांवर चालते. संविधान केवळ कायद्यांचे पुस्तक नाही; ते मूल्यांचा जाहीरनामा आहे. विज्ञान केवळ प्रयोगशाळेत नसते; ते प्रत्येक प्रश्नामागील चिकित्सक दृष्टी असते. समाजसुधारणा केवळ भाषणांतून होत नाही; ती विचारांच्या परिवर्तनातून घडते.

आजची पिढी एका निर्णायक वळणावर उभी आहे. एका बाजूला अंधानुकरण, व्यक्तिपूजा, द्वेषाचे राजकारण, डिजिटल दिशाभूल आणि अहंकारातून निर्माण झालेली 'मीच बरोबर' ही मानसिकता आहे; तर दुसऱ्या बाजूला विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन, संविधानिक मूल्ये, आत्मपरीक्षण आणि मानवी समानतेचा मार्ग आहे. निवड प्रत्येक नागरिकाने करायची आहे.

शेवटी प्रश्न एकच आहे आपण मताचे अनुयायी होणार की तत्त्वाचे? कारण मते बदलतात, सत्ता बदलते, चेहरे बदलतात, घोषणाही बदलतात; पण सत्य, न्याय, समता आणि मानवता ही मूल्ये चिरंतन असतात. म्हणूनच समाजाला मतवादापेक्षा तत्त्ववादाची अधिक गरज आहे.

आजही ही म्हण आपल्याला सावध करते‘मतवादी क्या जाने, तत्ववादी की बात; सूरज डूबा, उल्लू कहे हुआ सवेरा!' सूर्य मावळल्याने दिवस संपतो; सत्य संपत नाही. अंधार कितीही दाटला तरी पहाटेचा प्रकाश रोखता येत नाही. त्याचप्रमाणे मतवादाचा गदारोळ कितीही मोठा असला, तरी तत्त्ववादाचा प्रकाश अखेरीस समाजाला योग्य दिशा दाखवत राहतो.



**प्रफुल्ल मंदा श्रीधर**
सामाजिक कार्यकर्ता, जिल्हा कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अमरावती
मो.न.९६६५१८५४२८

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

जागृत इंग्लिश प्रायमरी अँड हायर प्रायमरी स्कूलमध्ये

# गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी




(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक जागृत इंग्लिश प्रायमरी अँड हायर प्रायमरी स्कूलमध्ये गुरुपौर्णिमेचा पवित्र सण मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी गुरुंवर आधारित भाषणे, कविता, गीते तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करत त्यांना शुभेच्छापत्रे व पुष्प अर्पण करुन आदर व्यक्त केला. मुख्याध्यापकांनी आपल्या मार्गदर्शनात गुरु–शिष्य परंपरेचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार आणि शिस्त यांचे महत्त्व पटवुन दिले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये गुरुंबद्दल आदर, कृतज्ञता आणि संस्काराची भावना अधिक दृढ झाली. मुख्याध्यापिका पूजा मांडवगळे, सुपरवायझर धनश्री लाडोळे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे संचालन इयत्ता ९ वीच्या विद्यार्थिनी माहीया ठाकरे व आलिया शेख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# गरजु व गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत शिकवणी वर्ग

नगरसेविका स्नेहल वघाळे यांचा अनोखा उपक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – गुरु पौर्णिमेचे औचित्य साधून येथील भाजपच्या नगरसेविका स्नेहल आकाश वघाळे यांनी नगरपरिषद शाळा क्र.२ येथे मोफत ट्युशन वर्ग सुरु केले आहे.

परिसरातील गोरगरिब विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याकरिता त्यांना योग्य मार्गदर्शन व शिक्षण मिळावं, या उद्देशाने नगरसेविका स्नेहल वघाळे यांनी आपल्या स्वखर्चातून शिक्षकाची नियुक्ती केली असुन वेळोवेळी विद्यार्थ्यांकरिता निराळे मार्गदर्शन व स्पर्धात्मक स्पर्धा करिता अनुभवी मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे व या मोफत ट्युशन क्लासेसचे गरजु विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन यावेळी स्नेहल वघाळे यांनी केले आहे. या ट्युशन वर्गाचे उदघाटन कार्यक्रमाला प्रभारी नगरपरिषद प्रशासन अधिकारी माधव तिडके, महात्मा फुले कला महाविद्यालयाचे डॉ.अतुल वंजारी, महिला व बालकल्याण सभापती प्रिया नेपाल पाटील, नगरसेवक विजय चौधरी, नगरपरिषद शाळा क्रं.२ चे शिक्षक प्रेमकुमार कापरे, शाळा समिती अध्यक्ष देवानंद राठोड, छोटू सावरकर, सचिन शिरभाते, आकाश वघाळे, यांच्या सह पालक व मित्र परिवार उपस्थित होता.

# येरवडा जेलबाहेर फटाकेबाजी करत कैदी गुंडाचं बर्थ-डे सेलिब्रेशन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** –मैत्री हे एक पवित्र नातं आहे. आपण मैत्रीचे अनेक किस्से देखील ऐकत असतो.

मात्र याचा मैत्रीचा एक अजब किस्सा पुण्यातून समोर आला आहे. यात एका जेलमध्ये कैद असलेल्या आरोपी गुंड मित्राच्या वाढदिवसानिमित्त चक्क जेलबाहेर फटाकेबाजी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. इतकंच नव्हे तर फटाकेबाजी केल्यानंतर त्याची रिल देखील सोशल मीडियावर व्हायरल केलीय. मात्र ही बाब पोलिसांच्या लक्षात येताच आरोपी गुंडाचा बर्थ–डे सेलिब्रेशन आणि सोशल मीडियावर हवा करणं या तरुणांना चांगलच महागात पडलं आहे.

# अबब... स्मार्ट मीटरचे बिल अव्वाच्या सव्वा

सौरभ मानकर यांची सहायक अभियंता यांच्याकडे चौकशी मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – स्मार्ट मीटर बसविल्यानंतर अनेक वीज ग्राहकांना अपेक्षेपेक्षा जास्त वीजबिल येत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत.

पूर्वीच्या तुलनेत देयकात मोठी वाढ झाल्याचा दावा ग्राहकांकडून केला जात असून त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील रहिवाशी श्रीराम मानकर यांच्या देयकामध्ये तब्बल तिपटीने वाढ झाली असुन यासंदर्भात त्यांचे पुत्र सौरभ मानकर यांनी सहायक अभियंता यांचेकडे चौकशीची मागणी केली आहे. वीज वापरात कोणताही लक्षणीय बदल नसतानाही बिलाच्या रकमेत मोठी वाढ होत आहे.

त्यामुळे स्मार्ट मीटरच्या अचूकतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. अनेकांनी संबंधित वीज वितरण कंपनीकडे तक्रारी दाखल केल्या असून बिलांचे तांत्रिक परीक्षण करुन योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

ग्राहक संघटनांनीही या प्रकरणाची सखोल चौकशी करुन नागरिकांना दिलासा द्यावा तसेच स्मार्ट मीटरमुळे वाढलेल्या देयकांचे कारण स्पष्ट करावे, अशी मागणी केली आहे. यासोबतच चुकीची बिले आढळल्यास ती तातडीने दुरुस्त करून ग्राहकांना न्याय देण्याची मागणीही होत आहे.

गेल्या वर्षी म्हणजे जुलै २०२५ ला त्यांचेकडे ३६७ युनिटचे बिल आले होते परंतु स्मार्ट मिटर लागताच तब्बल ११५३ युनिटचे बिल आल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

महात्मा फुले इंग्लिश कॉन्व्हेंट येथे

# लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – महात्मा फुले इंग्रजी पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळेमध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका अर्चना मोघे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण केले. अण्णाभाऊ साठे यांच्या जिवनकार्या विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यांची फकीरा ही गाजलेली कादंबरी विषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी सुद्धा भाषणे दिली. जयंतीनिमित्त थोर मराठी साहित्याची ओळख करून देण्यात आली.

कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षिका उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन रडके यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वितेकरिता मुख्याध्यापिका मोघे आणि सर्व शिक्षिका गायत्री आंडे, करुणा निंबुरकर, पुजा मेंढे, मंजुषा अकर्ते, शुभांगी पांडे, मेघा मोरे, प्रियंका कोडापे, अश्विनी रडके, पूजा टाकरखेडे आणि कर्मचारी वनिता वानखडे, माधुरी सुपले, वैभव सावरकर उपस्थित होते.

# एलपीजी सिलिंडर होणार महाग?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धामुळे जागतिक इंधन पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. याचा फटका भारतासह अनेक देशांना बसला आहे. अशातच आता आगामी काळात भारतातील एलपीजी सिलिंडरच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. एका आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार केंद्र सरकार जवळपास ३.९९ लाख कोटी रुपये उभारण्याच्या योजनेवर विचार करत आहे. यासाठी एलपीजी आणि नैसर्गिक वायू वापरणाऱ्या ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे समोर आले आहे. मात्र याबाबत केंद्र सरकारकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. समोर आलेल्या अहवालानुसार, एलपीजी आणि नैसर्गिक वायू वापरणाऱ्या ग्राहकांवर अतिरिक्त शुल्क लादून सुमारे ४२ अब्ज डॉलर उभारण्याचा प्रस्ताव आहे.

अमडापुरच्या स्व.इंदिराबाई देशमुख विद्यालयात

# अण्णाभाऊ साठे जन्मदिन लेखन प्रेरणा दिन म्हणुन साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – स्व.इंदिराबाई देशमुख विद्यालय अमडापूर येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जन्मदिन लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला.

यामध्ये विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांकडून अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्याबाबत माहिती लिहून घेण्यात आली आणि नंतर अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेची पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक अरविंद बहुरुपी होते. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगत यातून त्यांचे कार्य विशद केले. गणित शिक्षक एस.जे.पखाले यांनी वाचन व लेखन हे मानवी जीवनाचे महत्त्वाचे अंग आहे असे आपल्या मनोगतातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन जे.बी.पाटील तर आभार समीक्षा काकडे यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वितेकरीता सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मुख्याध्यापक आर.एम.काकडे यांचे सहकार्य लाभले.

'दो पेड माता– पिता के नाम' उपक्रम अंतर्गत सवेरा फाऊंडेशनचा

# वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – कलाजीवन बहुउद्देशीय संस्था संचलित स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुल ढगा येथे सवेरा फाऊंडेशन यांच्या वतीने दो पेड माता– पिता के नाम या संकल्पनेवर आधारित वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धन, हरित परिसराची निर्मिती आणि आपल्या माता–पित्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. उपस्थित मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी आणि स्वयंसेवकांनी आपल्या आई–वडिलांच्या सन्मानार्थ एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची शपथ घेतली. स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुलाच्या परिसरात हरित वातावरण निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी सवेरा फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.भारत भारती, सहसंस्थापक देवेंद्र बोडखे, संयोजक अनुप जैन आणि सहसंयोजक यांनी उपस्थितांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व पटवून देत प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला कलाजीवन बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष चित्रकार युवराज ठाकरे, संस्थापक रंजित इंगोले मुख्याध्यापक, नितीन ठाकरे, कविता वंजारी, रुपाली बघेल, ऋतुजा घोरमाडे, ज्योती शेंडे, विद्यार्थी उदय घोरमाडे, सवेरा फाउंडेशनचे सदस्य, स्वयंसेवक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन हर्षा वंजारी यांनी केले.

# साप आढळल्यास घाबरु नका, काळजीपूर्वक वागा

सर्पमित्र कमलाकर देशमुख यांचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**वरुड शहरातील सर्पमित्र**

१. आकाश सेलकर – ८२६२०९२०३२
२. मनिष बोंडे – ७३८७२५६२६६
३. ओप्रकाश कोहळे – ८०५५१८४७४३
४. नितीन भालेराव – ९०११८४२३००
५. दिपक खंडेलवाल – ९४२२८५९३०४
६. कमलाकर देशमुख – ९४२०१२६९४४

**वरुड** – तालुक्यात पावसाळ्याची सुरुवात झाली असून, पावसाचे पाणी बिळात शिरल्याने सरपटणारे प्राणी कोरड्या जागेच्या शोधात मानवी वस्तीकडे वळत आहेत. त्यामुळे सध्या घरांमध्ये, बाग किंवा दुकानांमध्ये साप निघण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. घरात किंवा परिसरात साप आढळल्यास मुळीच घाबरु नका, त्याच्यावर लांबुन लक्ष ठेवा आणि तातडीने सर्पमित्रांशी संपर्क साधा, असे आवाहन सेवानिवृत्त तहसिलदार तथा ज्येष्ठ सर्पमित्र कमलाकर देशमुख यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

पावसाळ्यात साप अनेकदा सुरक्षित जागेच्या शोधात अगदी घराच्या शयन कक्षातही मध्ये शिरतात. साप दिसताच नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते आणि बहुतांश लोक प्रत्येक साप हा विषारीच असतो या गैरसमजातून त्याला मारण्याचा प्रयत्न करतात. मात्र, या भीतीमुळे सापांचा जीव धोक्यात येतो आणि दिवसेंदिवस त्यांची संख्या कमी होत आहे. सर्पमित्रांच्या सतर्कतेमुळे हजारो सापांना जीवनदान

कमलाकर देशमुख यांनी पत्रकात नमूद केले की, मानवी वस्तीत साप निघाल्यास सर्पमित्र तातडीने मदतीला धावून येतात. सर्पमित्रांच्या या तत्परतेमुळे आणि सतर्कतेमुळे वर्षाकाठी सुमारे ७० ते ८० टक्के सापांना सुरक्षितपणे पकडून जंगलात सोडून जीवनदान दिले जाते. भारतात अनेक वन्यजीव संस्थाही या प्राण्यांच्या संरक्षणासाठी पुढे आल्या आहेत. साप दिसल्यास शांत राहा आणि त्याला छेडण्याचा किंवा मारण्याचा प्रयत्न करु नका. साप नेमका कुठे लपतोय, यावर दूरवरुन नजर ठेवा. संत्रानगरी वरुड शहरासह संपूर्ण तालुक्यातील घर, दुकान, शाळा किंवा महाविद्यालयात साप आढळल्यास त्वरित स्थानिक सर्पमित्रांना फोन करा. सर्पमित्र येऊन सापाला सुरक्षितपणे पकडतील आणि त्याला नैसर्गिक अधिवासात मुक्त करतील, असे आवाहन सेवानिवृत्त तहसीलदार तथा ज्येष्ठ सर्पमित्र कमलाकर देशमुख यांनी केले आहे.




### कोट्यवधींची धवलगिरी पेयजल योजना धुळखात

# दरमहा ५० ते ६० हजारांचे वीज बिल मात्र नियमित!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – मुख्यमंत्री पेयजल योजनेअंतर्गत लोणी गावासाठी मंजूर झालेल्या २ कोटी ९९ लाख रुपयांच्या धवलगिरी पाणीपुरवठा योजनेचे भवितव्य सद्य: धुळखात पडले आहे.

सन २०१९ मध्ये सावंगा येथून लोणी गावातील फिल्टर प्लांटपर्यंत मुख्य पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आले होते. त्यानंतर पाईपलाईनची यशस्वी चाचणी घेण्यात आली असून पाणी फिल्टर प्लांटपर्यंत पोहोचल्याचेही स्पष्ट झाले होते. धवलगिरी प्रकल्पाची सर्वात मोठी जमेची बाजु म्हणजे या योजनेला कॅनलच्या गेटमधून वर्षभर पाण्याचा पुरवठा उपलब्ध होत असल्याने बाराही महिने तुलनेने स्वच्छ व शुद्ध पाणी मिळू शकते. त्यामुळे नागरिकांना सातत्याने सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याची क्षमता या योजनेत आहे.




याऊलट, सद्य: वापरल्या जाणाऱ्या अप्पर वर्धा प्रकल्पाचा पाणीपुरवठा वर्धा नदीवर अवलंबून असल्याने पावसाळ्यात नदीला पूर आल्यानंतर गढूळ पाण्याचा पुरवठा होण्याच्या तक्रारी वारंवार समोर येतात. अशा परिस्थितीत धवलगिरी योजना कार्यान्वित झाल्यास नागरिकांना अधिक दर्जेदार पिण्याचे पाणी मिळण्यास मदत होऊ शकते. विशेष म्हणजे ही योजना ग्रॅव्हिटी पद्धतीची असल्यामुळे पाणीपुरवठा करण्यासाठी अतिरिक्त ऊर्जा खर्च कमी होतो. असे असतानाही ७ वर्षांनंतरही योजना प्रत्यक्ष सुरु करण्यात आलेली नाही. योजना सुरु नसतानाही वीज जोडणीसाठी दरमहा ५० ते ६० हजार रुपयांचे बिल महावितरणला भरले जात असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

पाईपलाईन पूर्ण, टेस्टिंग यशस्वी, पाणी उपलब्ध आणि ग्रॅव्हिटी पद्धतीची सुविधा असूनही योजना सुरु होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करुन जबाबदारांवर कारवाई करावी तसेच धवलगिरी पेयजल योजना तातडीने सुरु करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. कोट्यवधी रुपयांचा खर्च करुन उभारलेली योजना आजही धुळखात पडली आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून ही योजना कार्यान्वित केली तर लोणी गावातील नागरिकांना वर्षभर स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होऊ शकते, एवढे मात्र निश्चित.

# माफी मागितली नाही तर काँग्रेस नेत्यांच्या तोंडाला काळे फासू

### राष्ट्रवादीचा काँग्रेसला गंभीर इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांच्याबद्दल काँग्रेसच्या सोशल मीडिया अधिकृत संकेत स्थळावरून करण्यात



आलेल्या 'गुंगी गुडिया' या उल्लेखावरून माजी खासदार संजय काकडे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. सुनेत्रा पवार यांच्यावर अश्लाघ्य टीका करणाऱ्या काँग्रेस नेत्यांनी २४ तासांत माफी मागावी किंवा त्यांच्यावर पक्षाने कारवाई करावी, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते महाराष्ट्रात कुठेही काँग्रेस नेत्यांना फिरू देणार नाहीत आणि त्यांच्या तोंडाला काळ फासतील, असा इशारा राष्ट्रवादीचे नेते संजय काकडे यांनी बुधवारी येथे दिला. संजय काकडे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, सुनेत्रा पवार या एका कठीण कौटुंबिक आणि राजकीय प्रसंगातून सावरण्याचा प्रयत्न करत आहेत.

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |

# औद्योगिक भूसंपादनाची प्रक्रिया आता वेगवान

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश : एमआयडीसीच्या भूसंपादनाचा घेतला आढावा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – राज्यातील औद्योगिक गुंतवणुकीला अधिक चालना देण्यासाठी उद्योगांना लागणाऱ्या भूसंपादनाची प्रक्रिया आता अधिक वेगाने होणार आहे. त्यासाठी उद्योगांना आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी भूसंपादन, मंजूरी आणि भूखंड वाटपाच्या प्रक्रियेत आमूलाग्र बदल करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिले.

त्याचबरोबर भूखंड घेऊन वर्षानुवर्षे प्रकल्प सुरु न करणाऱ्या उद्योगांवरही दंडात्मक कारवाईसह ते पुन्हा ताब्यात घेण्याची भूमिका



सरकारने घेतली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी 'वर्षा' निवासस्थानी झालेल्या बैठकीत एमआयडीसीअंतर्गत विविध प्रकल्पांच्या भूसंपादनाचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी बोलताना फडणवीस यांनी राज्यामध्ये नवीन औद्योगिक वसाहतींचा विस्तार वेगाने होत असल्याने उद्योगांना आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे सांगितले. गतिमान भूसंपादन करून महाराष्ट्रात औद्योगिक विकासाला चालना द्यावी, अशा स्पष्ट सूचना फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

उच्चाधिकार समिती स्तरावरील मंजुरी, विविध प्रशासकीय टप्पे तसेच वनविषयक परवानग्यांमुळे होणारा विलंब कमी करण्यासाठी भूसंपादन प्रक्रिया अधिक सुलभ करावी. उद्योगांना आवश्यक जमीन वेळेत उपलब्ध व्हावी आणि गुंतवणूक प्रकल्पांना गती मिळावी यासाठी अनावश्यक प्रशासकीय टप्पे कमी करण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश फडणवीस यांनी दिले.

प्रकल्पाचे स्वरुप आणि गुंतवणुकीच्या प्रमाणानुसार भूखंड विकासासाठी निश्चित कालमर्यादा ठरवण्यात यावी. औद्योगिक जमिनीच्या वापरात सुसूत्रता आणि कार्यक्षमता आणण्यासाठी देश-विदेशातील सर्वोत्तम पद्धती तसेच इतर राज्यांतील धोरणांचा अभ्यास करून नवीन जमीन वाटप निकष निश्चित करावे, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

# मोदींची फेसबुक पोस्ट हटवल्याप्रकरणी मेटाने मागितली माफी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची फेसबुकवरील पोस्ट काही काळासाठी हटवल्या प्रकरणी मेटाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झुकरबर्ग यांनी माफी मागितली आहे. त्याचबरोबर बाल लैंगिक शोषण, डीपफेक आणि कंटेंट मॉडरेशनच्या चुकांची कबुली देत, अशी माहिती सरकारी सूत्रांनी बुधवारी दिली. ३ दिवसांचा अल्टिमेटम सरकारी सूत्रांनुसार, व्यासपीठावर मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर कंटेंटला प्रोत्साहन दिले गेले आणि विशिष्ट प्रेक्षकवर्गाला लक्ष्य करून पैसे घेऊन प्रमोशन केले गेले, हे मेटाच्या अधिकाऱ्यांनी मान्य केले आहे.







